एम.बी,ए साठी एम आय.टी,पुणे मध्ये प्रवेश घेतला आणि पहिल्या वर्षीच वाटायला लागलं की, मी एम.बी,ए चं शिक्षण पूर्ण करून झालं की घरचा व्यवसाय सांभाळेन ,मग लग्न करेन आणि एक यशस्वी उद्योजिका बनुन मी खुप नाव आणि पैसा कमवेन. असा सर्वसाधारण आयुष्याचा प्रवास ठरला होता. पण मग चाळीशी पर्यंत फक्त हाच प्लान का ? आणि मग रिटायर होऊन आहे त्यात समाधान मानत आयुष्य संपणार? चिमणा-चिमणी सुद्धा करतात तसा, सरधोपट प्लान मला नकोसा वाटायला लागला. त्यामुळे मी, माझं काम ,'माझं माझं' मधून बाहेर पडून काहीतरी वेगळ्याच्या शोधात होते.

तर, मी रखमा, रखमा हेमा श्रीकांत, (नावामध्ये आईचं नाव असावं आणि आडनावाने जातीधर्माचा उल्लेख होतो म्हणुन आडनाव नको, असं नाव शाळेपासून पालकांनीच लावलं आहे).मूळ साताऱ्याची.आई  सामाजिक कार्यकर्ती आणि बाबा व्यवसायिक.व्यवसाय आणि सामाजिक काम या दोन्हीचं exposure मिळालं. उद्योजिका बनुयात असं वाटत असताना एम.बी,ए ला आले, पण मग मी जर फक्त उद्योजिका बनले तर फक्त पैसे,नाव मिळेल पण त्यानी समाधान मिळणार नाही हे पक्कं वाटायला लागलं ; स्व ची भावना सोडून चांगल्या समाज निर्मितीसाठी काही करेन तेव्हाच समाधान मिळेल असं वाटले. मग मी ओळखीतील सामाजिक कार्य करणाऱ्या लोकांच्या गाठी भेटी घेत होते, ते काय काम करतात,कशासाठी,कोणासाठी वगेरे समजून घेत होते.

'कधी कधी असं वाटतं की काही गोष्टीचा,वाचनाचा, माहितीचा लगेच उपयोग होत नाही मग त्या वाया जातात का? तर माहितीतल्या गोष्टी योग्य वेळी आपोआप कामी येतात'. तीन ते चार वर्ष आधी आम्ही कुटुंबीय डॉ.अभय आणि डॉ.राणी बंग यांच्या SEARCH या आदिवासी आरोग्यासाठी काम करणाऱ्या संस्थेला भेट दिली होती आणि तिथे डॉ.राणी बंग यांनी 'निर्माण' या युवकांसाठीच्या उपक्रमाची माहिती दिली,मग मी उत्स्फूर्तपणे म्हणाले की मी येऊ का शिबिराला ? तर डॉ.राणी बंग यांनी मला जवळ घेऊन सांगितलं तु तर लहान आहेस,वीस वर्षांची झाली की ये,मग तो विषय तिथेच थांबला , पण नंतर काही तरी वेगळं,समाधानकारक, समाजाभिमुख करण्याच्या शोधात असताना 'निर्माण'चा संदर्भ आठवला आणि मी निर्माणचा फॉर्म भरला,माझी निवड झाली आणि स्व च्या समाधानाचा शोध via सामाजिक काम सुरु झाला.

डॉ.अभय व डॉ.राणी बंग यांनी समाजातील आव्हानं आणि अर्थपूर्ण जीवनाच्या शोधात असलेले युवा यांच्यात दुवा बांधण्यासाठी 'निर्माण' हा शैक्षणिक उपक्रम सुरु केला.'गांधीजींच्या नयी तालीम' या कृतीतून शिकण्याच्या शिक्षणपद्धतीवर 'निर्माण'ची ही शैक्षणिक प्रक्रिया आधारित आहे. युवकांना हेतुपूर्ण जिवन जगण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन देत, या प्रवासात त्यांना पाठबळ देऊन अशा युवांना संघटीत ठेवणं हे 'निर्माण'चं उदिष्ट.

'निर्माण' प्रक्रियेचा एक भाग म्हणुन तीन शिबिरांची एक मालिका विकसित करण्यात आली आहे.ही तीन शिबिरे सहा महिन्याच्या अंतराने असते,प्रत्येक शिबीर आठ दिवसांचे असते ; ही शिबिरे 'शोधग्राम',गडचिरोली येथे होतात. शिबिरादरम्यान स्वतःची ओळख, माझ्या आजूबाजूच्या समाजाची, निसर्गाची ओळख, समाजातील विविध प्रश्न व ते सोडविण्याच्या विविध पद्धती, प्रत्यक्ष काम करणाऱ्या लोकांसोबत संवाद अशा विविध टप्प्यामधून प्रवास करत युवकांना अर्थपूर्ण जीवनाचा मार्ग शोधण्यास मदत होते.

पहिल्या शिबिराला गेले तेव्हा तिथलं सुरक्षित वातावरण पाहुन मनात 'गडचिरोली' म्हणल्यावर जी भीती असते ती साफ गेली, 'शोधग्राम'चा खूप मोठा, स्वच्छ आणि निसर्ग रम्य परिसर मनाला भावतो. डॉ.अभय आणि डॉ.राणी बंग यांनी आणि निर्माणच्या अनुभवी व सच्च्या टीमने सर्वांना खूप लगेच आपलंसं करून घेतलं.माझ्या बरोबरील बाकी शिबिरार्थींना पण माझ्यासारखेच प्रश्न पडले आहेत हे समजल्यावर खूप आधार मिळाला आणि या उत्तरांच्या शोधात मी एकटी नाही हा विश्वास मिळाला.शिबिराच्या पहिल्या दिवसापासून विविध सत्रांमुळे, महाराष्ट्रातील विविध भागातून,विविध शैक्षणिक क्षेत्रातुन आलेल्या , like-minded मित्र मंडळींशी होणाऱ्या गप्पांनी आणि सत्रे घेण्यासाठी आलेल्या मान्यवरांशी होणाऱ्या मुक्त संवादाने हेतुपूर्ण जीवनाच्या शोधातला प्रवास हा माझा एकटीच नसून जोडीला खूप लोक आहेत, हा विश्वास संपादित झाला. आपल्याला समजून घेणार्या आणि मुक्त संवाद घडवून आणणाऱ्या निर्माण टीममुळे सर्वच शिबिरार्थी आपल्या समस्या,विचार,मते मुक्तपणे मांडत होते.

शिबिरांदरम्यान डॉ.अभय बंग यांनी गांधीजींचा एक विचार मांडला होता Be the change you want to see त्या नुसार माझ्यात आणि समाजात मला जे बदल व्हावेत असं वाटते ते करवून आणायची जवाबदारी माझीच आहे,मलाच तो change बनायचं आहे हे जाणवलं आणि हे बदल घडवण्यासाठी नुसते विचारच नाही तर त्याच्या पुढे जाऊन कृती पण करण्यासाठी ;कर के देखो' हा मंत्र मिळाला. मला काही तरी वेगळं,चांगलं आणि हेतुपूर्ण आयुष्य देईल असं जगणं हवं होतं. मग मी कसं आणि नक्की काय करू याची उत्तरे शिबिरादरम्यान हळूहळू मिळत गेली.ते करताना लागणारा आर्थिक,कौटुंबिक आधार यावर पण मार्गदर्शन मिळाले.समाजिक प्रश्नांवर काय काय विविध पद्धतीने काम करता येईल याची समज वाढली.मी ज्या समाजात वाढले तिथल्या समस्यांवर मी कृती करणे हा तर माझा स्वधर्म आहे, जवाबदारी आहे समजले.दोन शिबिरांदरम्यानच्या काळात विविध जागी शिबिरार्थींनी एकत्रितपणे कृती कार्यक्रम ,काही समस्यांवर उपाय शोधायला प्रयत्न केले,स्वयंसेवी संस्थांना भेटी दिल्या,स्वतः बद्दल,शिबिरांदार्म्यान शिकलेल्या गोष्टींवर विचार केला. निर्माणमुळे स्वत:तला बदल, मला आणि माझ्या आसपासच्या लोकांना, प्रकर्षाने जाणवला. माझी स्वतःबद्दल ची समज,विचारातील स्पष्टता वाढली .माझ्या 'लक्झरी' विषयी च्या कल्पना बदलू लागल्या.सामाजिक प्रश्नांचे भान वाढले आणि हे सर्व होत असतानाची अजून एक महत्वाची गोष्ट म्हणजे शिबिरार्थींची एकमेकांशी मैत्री वाढत होती,निर्माण म्हणजे असे मित्रमंडळी जे फक्त भौतिक गोष्टी, नवीन आलेले ट्रेंड्स ,वस्तू यावरच फक्त चर्चा करत नाही, तर एकमेकांना काय करायचं आहे आयुष्यात,आवडी निवडी, समस्या, छंद आणि सामाजिक समस्येवर आपली मते यावर ही बोलतात.

निर्माण हे शिबिरांपूरते सीमित न राहता निर्माण मधल्या गोष्टी जगण्याचा अविभाज्य घटक बनल्या आहेत जसं की, आयुष्यात सेटल होणे म्हणजे हेतुपूर्ण जिवन जगणे आहे. ज्या अडचणी फक्त मलाच आहेत असं वाटतं, खर तर त्या अडचणी सर्वांना थोड्या अधिक प्रमाणात असतात, मग आपण एकत्रित एकमेकांना समजून घेऊन उत्तरे शोधली तर?.मी एकटीने एखादया समस्येवर जर लहान कृती केली तर त्यानी संपूर्ण समस्या सुटणार नाही लगेच; पण त्या लहान कृतीच्या लाभार्थीसाठी माझी कृती लाख मोलाची असेल.

डॉ.अभय बंग सांगतात त्या प्रमाणे युवकांनी न्यूटन बनायला हवं, सतर्क डोळ्यांनी, सदबुद्धीने आणि करुणेच्या हाताने समाजाकडे पाहिल्यास ,रोज पडणारे कित्येक ॲपल आपल्याला नक्कीच दिसतील आणि ते पाहत असताना युवकाचाही न्यूटन होईल.

मी निर्माणच्या ६ व्या बॅचची शिबिरार्थी आहे आणि निर्माण समन्वयक समितीची सदस्य म्हणुन सध्या काम करते; जास्तीत जास्त युवकांना निर्माणशी जोडण्याचे काम करणार आहे.

२००६ पासून सुरु झालेल्या निर्माण उपक्रमाच्या आजपर्यंत ६ बॅचेस झाल्या आहेत.महाराष्ट्रातील विविध भागातील ८०० हून जास्त युवकांचा सहभाग असलेला समूह म्हणजे निर्माण. निर्माणच्या पुढील , ७ व्या बॅचची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. निर्माण बॅचसाठी निवड प्रक्रिया दोन टप्प्यात असते, पहिला टप्पा प्रवेश अर्ज आणि दुसरा मुलाखत. संपूर्ण महाराष्टातुन फक्त १०० जणांची निवड होणार आहे. ७व्या बॅचमध्ये सहभागी होण्यासाठी भरावयाचे निवड अर्ज http://nirman.mkcl.org या संकेत स्थळावरील 'डाउनलोड' सेक्शन मध्ये उपलब्ध आहेत.अधिक माहिती या संकेत स्थळवर तसेच फेसबुक पेज https://www.facebook.com/nirmanforyouth/ वर उपलब्ध आहे.निर्माण ही शिबिरांची फक्त मालिका नसून,प्रत्येक युवकांनी एकदा तरी घ्यावा असा अनुभव आहे,जो स्वतःला नक्कीच उन्नत करेल.



**रखमा हेमा श्रीकांत**